जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेशी करार

## शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रांतील संशोधन आणि सेवांचे होणार आदान-प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यादरम्यान शनिवारी शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील संशोधन आणि सेवा यांचे आदान-प्रदान करण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील रिसर्च सेंटर व हॉस्पिटल यांच्यादरम्यान पाच वर्षांपूर्वी आरोग्य सेवांचे आदान-प्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला होता. या कराराची यशस्विता पाहून त्याची व्याप्ती वाढवत डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत पुढील पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारावर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा. सोबत मान्यवर अधिकारी.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्था या दोहोंची शैक्षणिक व संशोधकीय प्रगती एकसारख्या गतीने सुरू आहे. पूर्वीच्या सामंजस्य कराराचा दोन्ही बाजूंना अतिशय चांगला लाभ झाला आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या सामंजस्य कराराची व्याप्ती आता व्यक्तींकडून संस्थांकडे सरकली आहे. शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटपासून ते सामाजिक कार्यापर्यंत असे अनेक अभ्यासक्रम आहेत, जे वैद्यकीय क्षेत्राला पूरक आणि उपयुक्त आहेत.

विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी मागील पाच वर्षांतील सामंजस्य कराराच्या फलश्रुतीविषयी सविस्तर माहिती दिली. करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक डॉ. शिंपा शर्मा, संशोधन संचालक डॉ. सी. डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. राजेश कल्लाप्पा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव डॉ. संजय जाधव, विश्वजित खोत, विनोद पंडित आदी उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचा खेळाडू अभिषेक देवकाते याची जर्मनीत होणाऱ्या 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स'साठी भारतीय संघात निवड झाल्याने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुभेच्छा दिल्या.

# अभिषेक धावणार जर्मनीत

## जागतिक स्पर्धेसाठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा खेळाडू अभिषेक देवकाते याची जर्मनीत होणाऱ्या 'वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५'साठी भारतीय संघात निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

नाईट कॉलेज ऑफ कोल्हापूर येथे शिक्षण घेत असलेला आणि शिवाजी विद्यापीठामध्ये सराव करणारा विद्यार्थी खेळाडू अभिषेक देवकाते याची जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्समधील दहा हजार मीटरच्या शर्यतीसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. त्याने शनिवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी कुलगुरूंनी त्याचा सत्कार करून स्पर्धेमध्ये भरीव यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव गजानन पळसे, प्रशिक्षक प्रकुल मांगोरे-पाटील, अमोल अळवेकर उपस्थित होते.

पुण्यनगरी



कोल्हापूर : अभिषेक देवकातेचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर.

# अभिषेक देवकातेची भारतीय संघात निवड

**कोल्हापूर :** जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठामध्ये सराव करणारा विद्यार्थी खेळाडू अभिषेक देवकाते याची निवड झाली. तो नाईट कॉलेज ऑफ कोल्हापूर येथे शिक्षण घेत आहे. ॲथलेटिक्समधील दहा हजार मीटरच्या शर्यतीसाठी त्याची भारतीय संघात निवड झाली. याबद्दल शिवाजी विद्यापीठात त्याचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव जी. आर. पळसे, प्रा. प्रकुल मांगोरे-पाटील (प्रशिक्षक), अमोल अळवेकर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी



कोल्हापूर : कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना संचालक डॉ. कृष्णा पाटील. सोबत अन्य मान्यवर.

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण आजची गरज : कुलसचिव डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** सद्यस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. या काळात दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज बनली आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८७ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

यावेळी संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, डॉ. मुफिद मुजावर यांनी प्रात्यक्षिके सादर केली. अभ्यास केंद्राच्या कामकाजाबाबत डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. सचिन भोसले, डॉ. सुशांत माने, डॉ. प्रवीण लोंढे, बबन पाटोळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी इंग्लंडमधील बाथ विद्यापीठामध्ये बी. एस्सी. (फायनान्स) पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम. ए. (अर्थशास्त्र) प्रथम वर्षात प्रवेश घेतल्याबद्दल दिया आवाडे यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वयंअध्ययन साहित्य देण्यात आले. स्वागत समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, प्रास्ताविक संचालक डॉ. कृष्णा पाटील, सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी आय. टी. प्रतिनिधी अमोल आडगुळे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते..

20 JUL 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रामाणिकपणे सेवा द्या, विद्यार्थी वाढतील

## डॉ. शिंदे : दूरशिक्षणच्या अभ्यास केंद्रातील समन्वयकांना मार्गदर्शन

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : विद्यार्थी संख्या घटण्याचे प्रमाण सध्या वाढत आहे. पारंपरिक महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमातील बदलांत होणारा विलंब हे कारण विद्यार्थी संख्या कमी होण्यामागे आहे. शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण महत्त्वाचे आहे. याद्वारे गरजू आणि वंचित यांना शैक्षणिक सेवा प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य होते. विद्यार्थ्यांना प्रोफेशनल पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या निश्चितपणे वाढेल, असा विश्वास कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना संचालक डॉ. कृष्णा पाटील. यावेळी शेजारी डॉ. चांगदेव बंडगर, व्ही. बी. शिंदे, अभिजित रेडेकर उपस्थित होते.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८७ अभ्यास केंद्रांतील समन्वयक, लेखनिकांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. संचालक डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर प्रमुख उपस्थित होते.

श्री. रेडेकर म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढीचा दर वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्यावर आधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण दिले पाहिजे.'

कार्यशाळेत आशीष घाटे, डॉ. मुफिद मुजावर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत डॉ. सूर्यकांत गायकवाड, [illegible], सचिन [illegible], सुशांत माने, प्रवीण [illegible], चंदन पाटील यांनी मार्गदर्शन केले. इंग्लंडमधील [illegible] विद्यापीठातून बी. एस्सी. (फायनान्स) पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.ए. (अर्थशास्त्र) प्रथम वर्षात प्रवेश घेतल्याबद्दल दिया आवाडे यांना डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वयंअध्ययन साहित्य देण्यात आले. यावेळी सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, आय. टी. प्रतिनिधी अमोल आडगुळे, सहायक कुलसचिव [illegible] उपस्थित होते. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर यांनी स्वागत केले. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JUL 2025 पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची रशियाला शैक्षणिक भेट

## रशियन पीपल्स फ्रेंडशिप युनिव्हर्सिटीच्या समर स्कूलसाठी निवड

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेच्या चार विद्यार्थ्यांना थेट रशियालाच शैक्षणिक भेट देण्याची संधी लाभली आहे. मॉस्को येथील रशियन पीपल्स फ्रेंडशिप युनिव्हर्सिटी येथे आयोजित समर स्कूलसाठी विभागातील राधा जाधव, प्रेरणा नलावडे, सारा नायकवडी आणि मयूर दादर्णे हे चौघे रशियन भाषा आणि संस्कृतीच्या सखोल अभ्यासासाठी रशियात दाखल झाले आहेत.

विदेशी भाषा विभागाने गेल्या काही वर्षांत रशियन भाषा अध्यापनात विशेष प्रगती साधली आहे. परिणामी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि रशियन पीपल्स फ्रेंडशिप युनिव्हर्सिटी या संस्थांच्या शैक्षणिक सहकार्याने रशियातील समर स्कूलमध्ये सहभागी होण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली. दि. २८ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना रशियन भाषेच्या प्रशिक्षणासह तेथील आधुनिक जीवनशैली, साहित्य आणि समाजव्यवस्था यांचाही अनुभव घेता येणार आहे. अभ्यासक्रमाचा संपूर्ण खर्च आयोजक संस्थेने उचलला असून, विद्यार्थ्यांना निवास आणि शैक्षणिक सुविधा मोफत मिळणार आहेत. दरम्यान, आम्ही मॉस्कोतील सर्व प्रमुख ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी देणार असल्याचे राधा जाधवने सांगितले.

> 'परदेशी भाषेतील अभिव्यक्तीचा आत्मविश्वास' हे यश अभिमानास्पद आहे. अशा संधी विद्यार्थ्यांचे जागतिक व्यक्तिमत्त्व घडवतात आणि परदेशी भाषेतील अभिव्यक्तीचा आत्मविश्वासही देतात.
>
> – डॉ. मेघा पानसरे, विदेशी भाषा विभागप्रमुख

पुण्यनगरी

# 'एईडीपी' अभ्यासक्रमांचा लाभ घ्या : डॉ. पाटील

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत 'अप्रेंटिसशीप एम्बेडेड डीग्री प्रोग्राम' अर्थात 'एईडीपी' अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. यामध्ये बी. एस्सी, मायक्रोबायोलॉजी, बी. एस्सी.-एम. एस्सी. (ए.आय.-एम.एल.), बी. ए. (फिल्म मेकिंग), बी. ए. (स्पोर्टस्), बी. कॉम (बी.एफ. एस.आय.) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच बॅचलर ऑफ इंटेरियर डिझाईन, बी. ए. (ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेटर), बी. एस्सी. (रसायनशास्त्र), बी. एस्सी. (भौतिकशास्त्र), बी. एस्सी. (संगणकशास्त्र), तसेच अन्न तंत्रज्ञान व व्यवस्थापन इत्यादी अभ्यासक्रम सुरू आहेत.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरीता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्या करीता ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत दि.०७/०८/२०२५** आहे.

**फेर प्रवेश परीक्षा - रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५**

ठिकाण – दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थे मार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या. https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा.क्र.दूरशिक्षण/९७
दि. २०/०७/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

तसेच इतर बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) (Distance Mode) या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरीता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्या करीता ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत** दि.०७/०८/२०२५ आहे.

**फेर प्रवेश परीक्षा - रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५**

ठिकाण - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थे मार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या.
https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा.क्र.दूरशिक्षण/९७
दि. २०/०७/२०२५

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

तसेच इतर बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) (Distance Mode) या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC (2021)
with CGPA 3.52

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागांकरिता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत दि. ०७/०८/२०२५** आहे.

**फेर प्रवेश परीक्षा - रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५**
**ठिकाण - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर**

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही.) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या.

https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा. क्र. दूरशिक्षण/९७
दि. २०/०७/२०२५

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

तसेच इतर **बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) (Distance Mode)** या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd. 1962
A++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरीता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्या करीता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.०७/०८/२०२५ आहे.

**फेर प्रवेश परीक्षा - रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५**

ठिकाण – दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थे मार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या. https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा.क्र.दूरशिक्षण/९७
दि. २०/०७/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

तसेच इतर बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) (Distance Mode) या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.